# जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्कर२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३ दिनांक. ३० .०६.२०२०

वाचाः- १) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश, विस्तारित आदेश दिनांक २२.०५.२०२० दिनांक ३१.०५.२०२०, दिनांक ०४.०६.२०२०, दिनांक ०७.०६.२०२०, दिनांक ०८.०६.२०२० व दिनांक २६.०६.२०२०

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांचे महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई आदेश क्रं. DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दि.३१.०५.२०२०, दिनांक ०४.०६.२०२०, दिनांक २५.०६.२०२०, व दिनांक २९.०६.२०२०.

COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE NANDED Dist.

**विषयः** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना च्या अनूषंगाने नांदेड जिल्हयात दिनांक ०१.०७.२०२० पासून दिनांक ३१.०७.२०२० चे मध्यरात्री पर्यंत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ लागू करणे बाबत.

**आदेश**

ज्याअर्थी या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक ०१ वरील नमूद आदेशान्वये नियमावलीसह दिनांक ३०/०६/२०२० पर्यंत नांदेड जिल्हयात नागरी, ग्रामीण व औद्योगिक क्षेत्रासाठी विविध आदेश पारित करण्यात आले आहेत.

आणि ज्याअर्थी संदर्भ क्र.०३ वरील मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे आदेश दिनांक २९.०६.२०२० नूसार राज्यात नियम व अटीच्या अधिन ताळेबंदीचा कालावधी दिनांक ३१.०७.२०२० पर्यंत वाढवून मार्गदर्शक सुचना, निर्देश निर्गमित केले आहेत.

त्याअर्थी, मी डॉ.विपीन इटनकर,(भा.प्र.से). जिल्हादंडाधिकारी नांदेड,फौजदारी प्रक्रीया दंड संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये संपूर्ण नांदेड जिल्हयात या कार्यालयाचे संदर्भ क्र.०१ वर नमूद आदेश जशास तसे दिनांक ०१ जुलै २०२० ते दिनांक ३१ जुलै २०२० च्या मध्यरात्री पर्यंत लागू राहतील.

सदर आदेशाची अंमलबजावणी करणाऱ्या सर्व अधिकारी यानी वरील नियमांची अमलबजावणी काटेकोरपणे, नियमाला धरून व मानवी दृष्टीकोणातुन करावी.

सदरील आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती,संस्था अथवा समुह हे साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल.

सर्व संबंधित यंत्रणांनी अत्यावश्यक साधने व सुविधा यांची साठेबाजी व काळाबाजार करणा-यां विरुध्द कठोर कारवाई करावी. तसेच वरील आदेशाची अंमलबजावणी करीत असतांना सद्हेतुने केलेल्या कृत्यासाठी कुठल्याही अधिकारी व कर्मचारी यांचेवर विरुध्द कुठल्याही प्रकारची कायदेशिर कारवाई अथवा खटला दाखल करता येणार नाही.

हे आदेश दि. ३०.०६.२०२० रोजी माझे सही शिक्यानिशी निर्गमित करण्यात आली आहे.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड.

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

१. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

**प्रतिलीपी - आवश्यकत्या कार्यवाहीस्तव**

२. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

D PC CORONA

# जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

३. पोलीस अधिक्षक, नांदेड
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
५. सर्व उपविभागीय दंडाधिकारी नांदेड जिल्हा
६. सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
७. सर्व तालुका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
८. सर्व संबंधित विभाग प्रमुख यांना अनुपालनास्तव
९. जिल्हा माहीती अधिकारी, नांदेड यांना व्यापक प्रसिध्दीस्तव.

जिल्हादंडाधिकारी नांदेड.